वॉरियर तायक्वांदो अकादमी
योद्धा बना, चिंता सोडा!
तज्ज्ञ ब्लॅक बेल्ट प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण
आजच जॉईन करा
शाखा : जुईनगर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे
9821143012 @warriortaekwondoacademy

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
माणसाला आपल्या दारिद्र्याची लाज वाटता कामा नये... लाज वाटायला पाहिजे ती दुर्गुणांची.
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

वर्ष : ०५ | अंक : १०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२५ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## चंद्रपुरात ५७.२६० ग्रॅम एम.डी. मॅफेड्रॉन ड्रग्ससह ४,१९,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील रहमतनगर भागात कुख्यात गुन्हेगार मोहम्मद शादाब अब्दुल रऊफ शेख याच्याकडून ५७.२६० ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.) ड्रग्स पावडर जप्त करण्यात आली. या कारवाईतून एकूण ४,१९,१०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, आरोपीविरुद्ध रामनगर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. ॲक्ट–१९८५ कलम–८ (क), २१ (क) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर व रामनगर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने केली. २२ ऑगस्ट २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, रहमतनगर येथील आरोपी शादाब शेख आपल्या घरी एम.डी. पावडर विक्रीसाठी ठेवून आहे. त्यानंतर पथकाने आरोपीच्या घरावर छापा टाकला असता, त्याच्या ताब्यातून एम.डी. पावडर तसेच अन्य मुद्देमाल असा एकूण ४,१९,१०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांनी सांगितले की, अंमली पदार्थांचे सेवन व विक्री ही समाजासाठी घातक बाब असून युवकांचे भविष्य उद्ध्वस्त करणारी आहे. अशा साखळीचा नायनाट करण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे. संशयास्पद व्यक्ती किंवा हालचालीबाबत नागरिकांनी त्वरित चंद्रपूर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे व रामनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक आसिफरजा शेख यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.

## पुण्यात पोलिस 'अलर्ट मोड'वर; गणेशोत्सव काळात असं असेल वाहतुकीचं नियोजन?



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, पुणे :** पुणे शहरात गणेशोत्सवासाठी होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी वाहतूक नियोजनाची तयारी केली असून शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. पोलिस आयुक्तांनी मंडळांना भेट देऊन पाहणी केली. गणेशोत्सव काळात म हिला सुरक्षेसाठी स्वतंत्र पथके तैनात असतील. शहरातील महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. 'यंदाच्या गणेशोत्सवात पुणेकरांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, यासाठी पुणे पोलिसांनी सर्वसमावेशक नियोजन आखलं आहे. मेट्रो प्रकल्पामुळे शहरातील अनेक मार्गांवर अडथळे निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतूक आणि सुरक्षेची तयारी करण्यात येत आहे,' अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी शनिवारी दिली. पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी सकाळी मानाच्या गणेश मंडळांसह मध्यवर्ती भागातील महत्त्वाच्या गणेश मंडळांना भेट देऊन मंडप, परिसरातील वाहतूक आणि बंदोबस्त याची पायी फिरून पाहणी केली. त्यांनी मेट्रो स्थानकांचीही पाहणी केली. या वेळी सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील, राजेश बनसोडे, पंकज देशमुख, उपायुक्त कृषिकेश रावले आणि वाहतूक शाखेचे उपायुक्त हिंमत जाधव उपस्थित होते. पाहणीनंतर पोलिस आयुक्तांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला.

गणेशोत्सव हा राज्यातील सर्वांत मोठा उत्सव असल्याने सुरक्षेवरही पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र पथके तैनात राहतील. समाजकंटकांवर तत्काळ कारवाई होईल. मोबाइल सर्व्हेलन्स युनिट्स म्हणजेच 'मिनी कंट्रोल रूम' तयार करून चौकशी गतिमान करण्यात येईल. गुन्हे शाखा सतत गस्त घालून बेकायदा कृत्यांवर कारवाई करील. प्रमुख चौक व मंडळ परिसरात सीसीटीव्ही निरीक्षण वाढविण्यात येणार आहे.

## शेतकऱ्याची कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या




**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.२४, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील देवला नाईक तांड्यावर आज सकाळी एका शेतकऱ्याने कीटकनाशक (इंटरिंग) प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.मृत शेतकऱ्याचे नाव अंकुश देवराव चव्हाण (वय ४५ वर्षे) असे असून, त्यांचा व्यवसाय शेती होता. सकाळी ते आपल्या शेतात गेले असता त्यांनी इंटरिंग प्राशन केले. ही बाब उघडकीस आल्यानंतर त्यांना तातडीने गोकुंदा येथील टीबी सेंटर दवाखान्यात दाखल करण्यात आले. मात्र, प्राथमिक उपचारानंतर त्यांना आदिलाबाद येथील दवाखान्यात हलविण्यात आले असता तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.या घटनेमुळे देवला नाईक तांड्यावर हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पाठीमागे पत्नी, एक मुलगी व दोन मुले असा परिवार आहे. शेतकऱ्याच्या या आत्महत्येमुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रश्न गंभीर स्वरूपात समोर आला आहे.

## महात्मा फुले चौक पोलिसांची मोठी कामगिरी; दोन शातिर गुन्हेगारांसह महिला अटक



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.२४, कल्याण :** महात्मा फुले चौक पोलिसांनी मोठी कारवाई करत दिवसाढवळ्या चोरी करणाऱ्या दोन शातिर गुन्हेगारांसह एका महिलेला अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून १० तोळे सोने व १ किलो चांदी, एकूण किंमत सुमारे ₹७,२०,०००/- इतका मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई गुन्हा क्र. ४१५/२५, भा.दं.सं. कलम ३३१(३), ३३१(४), ३, ५ अन्वये करण्यात आली. हा गुन्हा १७ एप्रिल २०२५ रोजी दाखल झाला होता. या दिवशी आरोपींनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केली होती. तपासादरम्यान मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजमधून हे आरोपी नालासोपारा परिसरातील कुख्यात गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. पुढील चौकशीत हेही समोर आले की, या आरोपींनी याच वर्षी जून महिन्यात तारापूर एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतही चोरी केली होती.

तारापूर पोलीस व महात्मा फुले चौक पोलिसांच्या संयुक्त कारवाईत साजिद शेख (३६, रा. नालासोपारा) याला अटक करण्यात आली. तांत्रिक चौकशीत समोर आले की चोरीचा माल त्याच्या मित्र राहुल चौधरीकडे असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर राहुललाही ताब्यात घेण्यात आले.

राहुलच्या चौकशीत उघड झाले की, चोरीचा माल त्याने आपल्या पहिल्या पत्नी प्रीती कदमच्या माध्यम ातून विकला होता. त्यानंतर पोलिसांनी प्रीती कदम हिला देखील अटक केली. तिच्या मोबाईलची तपासणी करताना संबंधित सराफाची माहिती मिळाली व त्याच्याकडून १० तोळे सोने व १ किलो चांदी जप्त करण्यात आली.

या प्रकरणात आरोपींचा आणखी एक साथीदार सावेज फरार असून तो सध्या दिल्लीमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्याच्या शोधासाठी पथक रवाना झाले आहे.

ही संपूर्ण कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीरामसिंग परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील भुजबळ, पोलिस हवालदार संदीप साळुंखे, पोलिस शिपाई महेश कोळी, श्रीधर वडगावे व गंगाराम जाधव यांच्यासह महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली.

या कारवाईदरम्यान महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यातील आणखी एक गुन्हा – गु.क्र. ४१२/२५ (दिवसाढवळ्या चोरी) – उघडकीस आला.

या यशस्वी कामगिरीमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला असून पोलिसांनी स्पष्ट केले आहे की अशा शातिर गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार आहे.

## शेतातील विहिरीवर गेली अन् विवाहितेने आयुष्य संपवलं



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील उदयनगर येथे सासरच्या त्रासाला कंटाळून एका ४२ वर्षीय विवाहितेने स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी घेत आपल्या आयुष्याची अखेर केली. ही घटना २० ऑगस्ट रोजी वैरागड येथे घडल्याची माहिती आहे.

वैरागड येथील मीरा भास्कर घोगरे (वय वर्ष ४२) या महिलेने २० ऑगस्ट रोजी दुपारी तीन ते चार वाजेच्या दरम्यान स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी घेत आपली आयुष्य संपवलं आहे. याबाबत मृतक महिलेचा भाऊ यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद देत दिली आहे. बहीण मीरा हिला तिचा पती भास्कर घोगरे, सासू गुंफाबाई दिगंबर घोगरे व दीर राजू भास्कर घोगरे यांनी घरगुती कारणावरून, वडिलांचे प्लॉट का मागत नाही, या कारणावरून बहिणीला वारंवार मारहाण करून तिचा शारीरिक व मानसिक छळ केला, तिला जीव देण्यास प्रवृत्त केले, अशी फिर्याद मृत महिलेचा भाऊ विठ्ठल सखाराम आडळकर (वय वर्ष ५०, राहणार तळणी तालुका मंठा) यांनी अमडापूर पोलीस स्टेशनला दिली. त्यावरुन पोलिसांनी तपासाची चक्र फिरवत आरोपी पती भास्कर दिगंबर घोगरे (वर्ष ५०), सासू गुंफाबाई दिगंबर घोगरे (वय वर्ष ७५) आणि दीर राजू भास्कर घोगरे (वय वर्ष २६) यांच्याविरुद्ध अपराध क्रमांक २७८/ २० २५ कलम १०८ ,३५ ८५ बी एन एस नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास अमडापूर पोलिस स्टेशनचे सह पोलीस निरीक्षक निखिल निर्मळ करीत आहेत.

### घाटाखाली देखील घडली अशीच घटना...

ही बुलढाण्यापासून हाकेच्या अंतरावर जिल्हा मुख्यालयापासून असल्यानंतर त्याच प्रकारचं एक घटनाक्रम घाटाखाली म्हणजे मोताळा तालुक्यात समोर आलं आहे. घरगुती व शुल्लक कारणावरून तसेच चरित्र्यावर संशय घेऊन एका २५ वर्षीय विवाहितेचा शारीरिक तथा मानसिक छळ केला गेला. या त्रासाला कंटाळून अखेर त्या विवाहितेने विहिरीत उडी घेऊन आपले जीवन संपवले. ही घटना २१ ऑगस्ट रोजी मोताळा शिवारात उघडकीस आली. याप्रकरणी बोराखडी पोलिसांनी पतीसह चार जणांविरुद्ध पुन्हा दाखल केला आहे.

## रस्ते विकासासाठी खा. नीलेश लंके यांची केंद्रीय मंत्री गडकरींकडे मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील रस्ते विकास, अपघात नियंत्रण आणि वाहतूक कोंडीच्या समस्यांचे निरसन तसेच प्रादेशिक औद्योगिक व पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन तातडीची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

छत्रपती संभाजीनगर – अहमदनगर – शिरूर – पुणे या महामार्गाचे सहा लेन सिमेंट काँक्रीटीकरण करून प्रवास सुरक्षित व जलद करण्याचा प्रस्ताव खासदार लंके यांनी केंद्रापुढे मांडला आहे. शिर्डी, शनी शिंगणापूर, नेवासा यांसारख्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांसह अहमदनगर–पुणे औद्योगिक पट्ट्याचा विकास यामुळे वेगाने होईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

कोठला–शेंडी उड्डाणपुलाने नगरकरांना दिलासानगर शहरातील कोठला–शेंडी म ार्गावर गंभीर वाहतूक कोंडी व अपघातांची समस्या ओढवली असून, येथे उड्डाणपुल उभारण्याची तातडीची गरज असल्याचे खासदार लंके यांनी नमूद केले. या पुलाम ुळे वाहतूक कोंडी कायमची सुटेल आणि शहराची प्रतिमा अधिक भव्य बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातून जाणाऱ्या सुरत – चेन्नई ग्रीनफिल्ड एक्स्प्रेसवेच्या १०० किमी मार्गासाठी जमिन अधिग्रहण पूर्ण झाले असून, शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याचे खासदारांनी पत्रात नमूद केले. हा प्रकल्प सुरू झाल्यास औद्योगिक गुंतवणूक, कृषी उत्पादन निर्यात आणि साखर इथेनॉल उद्योगाला मोठी चालना मिळेल असे ते म्हणाले. सावळी विहीर ते नगर बायपास (एनएच १६०) रस्त्यावर गेल्या काही वर्षांत ४०० हून अधिक अपघाती मृत्यू झाल्याची गंभीर बाब अधोरेखित करत खासदार निलेश लंके यांनी या प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. त्यांनी उपोषण केल्याने प्रशासनाने आश्वासन दिले मात्र काम थांबलेलेच असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

**खासदार लंके यांची भूमिका !**

माझ्या मतदारसंघातील जनतेच्या सुरक्षेततेसाठी, अपघात रोखण्यासाठी आणि प्रदेशाच्या विकासासाठी हे प्रकल्प विलंब न होता सुरू व्हावेत, अशी माझी ठाम भूमिका आहे. मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वाखाली देशभरात दर्जेदार रस्ते झाले, तशीच गती अहिल्यानगर जिल्ह्यालाही मि ळावी,ही जनतेची अपेक्षा आहे असे खासदार निलेश लंके यांनी सांगितले.

## विवाहितेची बॉडी विहिरीत सापडली

### माहेरच्यांचा मोठा आरोप...

**दि.२४, नाशिक :** तालुक्यातील वडगाव पंगू येथील विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ करून तिला धारधार हत्याराने मारहाण करून जीवे मारल्याची फिर्याद दाखल झाली आहे. याप्रकरणी चांदवड पोलिसांनी सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, विवाहिता पूजा वैभव आहेर (वय२५) हिचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि.२१) सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास उघडकीस आली होती. याबाबत विवाहितेचा भाऊ अभिजीत कैलास गवळी (रा. कानमंडाळे) याने चांदवड पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, बहीण पूजा हिचा पती वैभव मोहनदास आहेर, सासरे मोहनदास नारायण आहेर, सासू राजूबाई उर्फ लताबाई मोहनदास आहेर, भाया केशव मोहनदास आहेर, जाऊ रुपाली केशव आहेर (सर्व रा. वडगावपंगू) यांनी पूजाच्या चारित्र्यावर संशय घेऊन व तिला मूलबाळ होत नाही या कारणातून लग्नानंतर तीन ते चार महिन्यांपासून ते दि.२१ पर्यंत वेळोवेळी मानसिक व शारीरिक त्रास देऊन तिचा छळ केला. त्याचबरोबर तिला धारधार हत्याराने मारहाण करून जीवे मारले व तिचा मृतदेह सासरच्या घराच्या पाठीमागील शेतातील विहिरीत फेकून दिला. दिल्याबाबत फिर्याद दिली. यावरुन पोलिसांनी सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास सुरू आहे.

# संपादकीय

## 'डिफेन्स क्लस्टर' ची प्रतीक्षा

रक्षण उत्पादन क्षेत्रात देशाने गेल्या काही वर्षांत प्रगतीचा नवा अध्याय लिहिला आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी जाहीर केल्यानुसार, २०१४ मध्ये केवळ ६०० कोटी रुपयांचे असलेले देशांतर्गत संरक्षण उत्पादन २०२४मध्ये तब्बल २४ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. २०२९पर्यंत ५० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासाठी 'संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर' ही एक ऐतिहासिक संधी आहे. या कॉरिडॉरमध्ये पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक, धुळे आणि नागपूर यांचा समावेश असणार आहे. या कॉरिडॉरमध्ये छत्रपती संभाजीनगरला प्रमुख केंद्रबिंदू करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

मराठवाड्याची औद्योगिक राजधानी म्हणून आधीपासूनच विकसित असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑरिक, चिकलठाणा, वाळुज, शेंद्रा, बिडकीन यांसारख्या औद्योगिक क्षेत्रांत जगप्रसिद्ध कंपन्या उत्पादन करतात. वाहन, यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक्स, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, कृषी आदी विविध क्षेत्रांतील उद्योग येथे आहेत. संरक्षण उत्पादनासाठी आवश्यक असलेली अचूक अभियांत्रिकी व कुशल मनुष्यबळ येथे सहज उपलब्ध आहे.

संरक्षण उद्योगासाठी स्वतंत्र 'क्लस्टर' उभारले गेल्यास गुंतवणुकीला चालना मिळू शकते. स्थानिक उद्योगांना मोठ्या प्रकल्पांच्या पुरवठा साखळीत सामील होण्याची संधी मिळेल आणि युवकांसाठी हजारो रोजगारनिर्मिती होईल. पाच हजारांहून अधिक संरक्षण उत्पादने देशांतर्गत तयार करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. अशा वेळी छत्रपती संभाजीनगरमधील 'डिफेन्स क्लस्टर' आणि महाराष्ट्रात होऊ घातलेल्या 'डिफेन्स कॉरिडॉर'मध्ये होणारा समावेश या राष्ट्रीय उद्दिष्टाला हातभार लावू शकेल.

राज्य सरकार आठ हजार एकर औद्योगिक जमीन संपादन करण्याच्या तयारीत आहे. या पार्श्वभूमीवर एक हजार एकरांचे 'डिफेन्स पार्क' छत्रपती संभाजीनगरमध्ये विकसित करणे तितकेच व्यवहार्य ठरेल. चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर (सीएमआयए) या औद्योगिक संघटनेने ऑरिक-बिडकीन, आरापूर एमआयडीसी तसेच समृद्धी महामार्गावरील नोड यांसारखी ही ठिकाणे यासाठी सुचविली आहेत.

'सीएमआयए'कडून डिफेन्स क्लस्टरची मागणी २०१६पासून सातत्याने होत आहे. गोवा येथे झालेल्या 'डिफएक्स्पो इंडिया २०१६'मध्ये येथील १६ प्रमुख संरक्षण पुरवठादार कंपन्यांनी सहभाग घेतला होता. तेव्हाच संरक्षण क्षेत्रातील सामर्थ्य देशासमोर आणण्यात आले. त्यानंतर केंद्राचे तत्कालीन वाणिज्य व उद्योग मंत्री सुरेश प्रभू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी अनेकदा छत्रपती संभाजीनगरमध्ये 'डिफेन्स क्लस्टर' उभारण्याचे संकेत दिले होते.

संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याने या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्याची वेळ आली आहे. संरक्षण उद्योग फक्त मोठ्या कंपन्यांपुरता मर्यादित नाही. आज शहरात अनेक स्टार्टअप्स आणि सूक्ष्म, लघू व मध्य उद्योग ड्रोन, एव्हिओनिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि प्रगत सेन्सर्ससारख्या क्षेत्रांत काम करत आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये 'डिफेन्स क्लस्टर' उभारल्यास या उद्योजकांना थेट संरक्षण पुरवठा साखळीत प्रवेश मिळू शकतो. यामुळे स्थानिक उद्योजकतेला चालना मिळेल.

भारताचा संरक्षण आयातीवरील खर्च कमी करणे आणि देशांतर्गत तंत्रज्ञान व उत्पादन क्षमता वाढवणे हे आत्मनिर्भर भारताचे ध्येय आहे. 'डिफेन्स क्लस्टर' या उद्दिष्टपूर्तीसाठी निर्णायक ठरू शकते. एकदा मोठ्या प्रकल्पाची स्थापना झाली, की इतर पुरवठादार व सहायक उद्योग आपोआप येथे आकर्षित होतील आणि संपूर्ण संरक्षण इकोसिस्टीम विकसित होईल. छत्रपती संभाजीनगरातील औद्योगिक वसाहतीत 'डिफेन्स क्लस्टर'ची औपचारिक घोषणा कधी होणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे.



आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी.

गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.




श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

# पुण्यातील मानाचे-प्रसिद्ध गणपती

**(भाग -२)**

मानाच्या गणपतींसोबतच जगप्रसिद्ध असलेल्या गणपतींपैकी एक म्हणजे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती. १८९३ मध्ये या गणपतीची स्थापना झाली आणि १९८४ मध्ये मूर्तीची स्थापना मंडळाने केली.कर्नाटक चे प्रसिद्ध मूर्तिकार शिल्पींनी ही मूर्ती घडवली ज्यात गणेश यंत्र बसवले. सोन्याचा मुकुट, कान, पाय, विविध आयुधे, रुद्राक्षाचा हार, वैभव हार असे अनेक सोन्याचांदीचे हिरेजडित दागिने हे गणपतीला असून केवळ वस्तूंनीच नव्हे, तर सांस्कृतिक- सामाजिक क्षेत्रात स्वतःची असलेली बांधिलकी जाणत काम करणारा आणि अशा प्रकारे श्रीमंत ठरणारा हा दगडूशेठ गणपती सगळ्यांचाच लाडका आहे. अनेक प्रकारच्या सामाजिक, शैक्षणिक,आरोग्य विषयक सेवा मंडळ मार्फत पुरवल्या जातात. संपूर्ण मंदिराचा परिसर हा भावभक्तीच्या सुगंधाने दरवळणारा असतो. ह्याची ख्याती इतकी आहे की, पुण्यात येणारी व्यक्ती ही प्रथम दगडूशेठ





गणपती दर्शन घेऊन, आशीर्वाद घेउनच जातो. वर्षभरात अनेक मान्यवर सेलिब्रिटी राजकीय नेते धार्मिक अध्यात्मिक क्षेत्रात प्रसिद्ध व्यक्ती असे सारे या गणपतीचे दर्शन घेतल्याशिवाय जात नाही.

भाऊसाहेब रंगारी गणपती- भाऊसाहेब रंगारी हे राजवैद्य होते.१८९२ साली भाऊसाहेब रंगारी यांनी आणि त्यांच्या तेरा सहकाऱ्यांनी मिळून सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला

भाऊसाहेब रंगारी यांचं मूळ नाव भाऊ लक्ष्मण जावळे होते. सार्वजनिक गणेशोत्सवात त्यांचं महत्त्वाचं नाव मानलं जातं. भाऊसाहेब हे त्याकाळी राजवैद्य होते. शालूंना रंग देण्याचा त्यांचा पारंपारिक व्यावसाय होता. त्यावरुन त्यांना रंगारी हे उपनाव पडल.

हा गणपती चार हातांचा आहे. गणपतीने राक्षसाचा एक हात सोंडेत धरलेला आहे. गणपतीने आपला मोडलेला दात आयुध म्हणून हाती धरलेला आहे आणि एका हाताने राक्षसाचे केसदेखील पकडले आहेत, अनेक उपक्रम या मंडळामार्फत वर्षभरात राबवले जातात डी.जे मुक्त गणेशोत्सव याविषयी आता प्रयत्न करत आहेत.

महात्मा फुले मंडई ही पुण्यातील ऐतिहासिक वारसा असणारी वास्तू आहे. मंडई ही तशी समाजातील सर्व वर्गांतील लोकांनी एकत्र येण्याची जागा. अशाच ठिकाणाचा, अनेकांचा श्रध्दास्थान असणारा आपलासा वाटणारा गणपती म्हणजेच मंडई मंडळाचा शारदा गजानन. उजव्या सोंडेचा हा गणपती तक्क्याला रेलून आसनस्थ आहे. बाप्पाचा एक पाय शारदेने मांडीवर घेतला असून ती तो चेपत असून पालथी मांडी घातलेल्या शारदेच्या उजव्या खांद्यावर गणपतीने डावा हात ठेवला आहे. या गणपतीच्या बाजूला मूषकाची चांदीची प्रतिमदेखील आहे. दोन्ही मूर्तींचे नक्षीकाम उठावदार आहे. त्यामुळे कानात घातलेला दागिना आपल्याला स्पष्ट दिसतो. अत्यंत बोलकी अशी ही मूर्ती आहे. मूर्तीची महिरप, पाट चांदीचा असून सोबतच सोन्या-चांदीच्या दागिन्यांनी हा गणपती सजलेला आहे. गणपती तसेच शारदेस अनेक प्रकारच्या साड्यांनी, उपरण्यांनी सजविले जाते. रेशम, मलमलच्या वस्त्रांचा प्रामुख्याने उपयोग होतो. मंडईच्या लगत असूनही या गणपतीचे मंदिर कमालीचे शांत भासते.

पुण्यातील मंदिरांची नावेही वैविध्यपूर्ण असतात. जिलब्या मारुती मंडळाचा गणपती हे त्यापैकीच एक उदाहरण. १९५४ मध्ये या गणपतीची स्थापना झाली. येथे असणार्या मारुतीला पूर्वी जिलब्यांचा नैवेद्य दाखवला जात असतो म्हणून त्याचे नाव जिलब्या मारुती पडले. नंतर मंडळाने गणपतीची स्थापना केल्यावर २१ किलो जिलब्यांचा नैवेद्य दाखवतात. सोन्याचांदीचे विविध आभूषणे,कमळ, रुद्राक्ष हार, ओम सोन्याचे दात, सोनसाखळी अशा अनेक दागिन्यांनी सजलेला हा गणपती आहे. या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे गेली दहा वर्षे या गणपतीला पुणेरी फेटा बांधला जातो. अत्यंत बोलके डोळे असणार्या ह्या गणपतीची मूर्ती विलोभनीय आहे.

स्वातंत्र्यपूर्वीच्या काळामध्ये हत्ती गणपतीची स्थापना झाली. पुण्यामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होत असताना १८९३ साली हत्ती गणपती मंडळाची स्थापना करण्यात आली. देवकर, पानसरे, पडवळ आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी ही स्थापना केली. गणरायाचे रुप हत्तींशी एकरुप झालेले आहे हे तर आपल्याला माहितीच आहे. पण या गणपतीला हत्ती गणपती असे नाव का पडले असा प्रश्न निर्माण होतो. याचे उत्तर म्हणजे गणरायाचे वाहन मुषकराज असले तरी हत्ती गणपती हा हत्तीवर विराजमान झालेला आहे.

सध्या विराजमान असलेली हत्ती गणपतीची ही तिसरी मूर्ती आहे. मूर्ती रुप अत्यंत प्रभावी आणि देखणे आहे. गणराय पद्मासनामध्ये अभय देतानाची मूर्ती आपण अनेकदा पाहतो. पण हत्ती गणपती हा हत्तीवर लढाईसाठी स्वार झालेला आहे. हत्तीच्या खाली वाघ असून गणराय वाघाला मारत आहे. हा वाघ इंग्रजांच्या माजलेल्या सत्तेचे रुपक आहे. या इंग्रज मदमस्त सत्ता आणि जाचक प्रवृत्तीचे संहार करताना गणराया दिसून येत आहे. गणरायाची मूर्ती १३ फूट उंचीची असून गणरायाच्या हातांमध्ये शस्त्र आहे. मागच्या उजव्या हातामध्ये परशू तर डाव्या हातामध्ये गदा आहे. पुढील दोन्ही हाताने गणरायाने त्रिशुल उगारले आहे. या हत्ती गणपती मंडळाला १३४ वर्षांचा इतिहास आहे. पुण्यातील अनेक शतकोत्सव पार केलेल्या गणपतींपैकी हत्ती गणपती.

शिवकालीन, पेशवेकालीन आणि त्यानंतर टिळकांनी सुरु केलेल्या गणेशत्सवाचा पुणे शहर साक्षीदार आहे. मोठ्या इतिहासाचादेखील साक्षीदार आहे. अनेक रंजक कथा, पौराणिक गोष्टी आणि ऐतिहासिक वारसा आपल्याला पुण्यातील गणेशोत्सवात पाहायला मिळतो.

मानाचे पाच गणपती, महत्वाचे काही गणपती, रंजक नावे असलेले गणपती आणि त्यानंतर येतात तालमीतील गणपती. पुण्यात अनेक तालमीत गणेशोत्सव साजरा केला जात होता. त्यांच्या नावाने गणेशोत्सव साजरा होतो. गणेशोत्सवाच्या काळात या सर्व मंडळांमध्ये धार्मिक सामाजिक सांस्कृतिक आणि संगीत विषय कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केलेले असते.

ऐन गणेशोत्सवात पुण्यात येणे, पुण्यातील गणपतीचे दर्शन घेणे, कार्यक्रमाचा लाभ घेणे,उकडीच्या मोदकांचा, पेढ्यांचे मोदकांचा प्रसाद ग्रहण करणे हा एक विशेष अनुभव आहे असे म्हणावे लागेल.

।। जय गजानन.।।।

(समाप्त)



दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव
मोबा. ८९९९५६६९१७

## रस्ता शिरस्ता..

रस्त्या वरती घालावे
मस्त मांडव प्रशस्त
नको हॉल भाड्याने
रस्ता फुकाट स्वस्त

प्रत्येकाच्या खिशात
खुशीत नांदते किस्त
कारवाई ती कुचराई
ज्याचेवर असे भिस्त

सामान्यसोसतो त्रास
गुंडोबामंडळ विश्वस्त
न उच्चार चकारशब्द
पुढारी करी आश्वस्त

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

काय करायचे रे मला
स्वभाव बुवा भिडस्त
तोंडा मोठाली कूलूपे
भाबडेपणात नेमस्त

अब्रु नाचते रस्त्यावर
घरातआम्ही अस्वस्थ
ताशेरे मारून मोकळे
सिस्टीमचं अत्यवस्थ

गल्लीची ना काळजी
दिल्ली फिकीरजास्त
लोकशाही कळा साहे
ज्याला जे वाटतेरास्त

- हेमंत मुसरीफ, पुणे
मो. ९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## प्रमोद गांधी यांचा अभिनव उपक्रम; गणेशभक्तांना दिलासा



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, मुंबई :** गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जाणाऱ्या मुंबई सह मुंबई उपनगरात राहणाऱ्या गुहागर विधानसभा क्षेत्रातील कोकण वासीयांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली व विशेष सहकार्याने एक वाडी एक गाडी असा अभिनव उपक्रम राबवत ५० टक्के सवलतीच्या दरात एसटी बसेसची सोय करून देण्यात आल्याने गुहागर, चिपळूण, खेड, स्थित कोकणवासीयांना आपल्या कुटुंबासह गावी जाण्यासाठी मोठा दिलासा मिळाला. दिनांक २३, २४, २५ ऑगस्ट २०२५ रोजी सदर बसेस गुहागर विधानसभा क्षेत्रात विविध ठिकाणी सोडण्यात आल्या असून सर्वाधिक गाड्या ह्या विरार येथून रवाना होणार असल्याचे मनसेचे सहसंपर्क अध्यक्ष समीर जोयशी यांनी प्रसिद्धी माध्यमांना माहिती दिली. गांधी यांनी समस्त कोकणवासीयांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या असून गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होण्यासाठी प्रशासन व पोलीस यंत्रणा यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## निवोशीत उखडलेल्या रस्त्यावर ग्रामस्थांचे श्रमदान



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, निवोशी (गुहागर) :** कोकणात झालेल्या मुसळधार पावसामुळे गुहागर तालुक्यातील निवोशी गावातील रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. प्रशासन सह लोकप्रतिनिधी यांचे सदर रस्त्यांच्या कामी दुर्लक्ष होत असल्याने ऐन गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांना श्रमदान करावे लागले. स्थानिक जागृत विकास मंडळाचे अध्यक्ष विजय अवेरे यांच्या पुढाकाराने आणि नाणेवाडी, कातळवाडी व गणेशवाडीतील ग्रामस्थांच्या सहकार्यातून वरवेली रांजणेवाडी ते निवोशी रस्त्यावरील खड्डे बुजवणे व झाडी साफसफाई करण्याचे काम रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी श्रमदानातून करण्यात आले त्याचप्रमाणे मळण निवोशी पालशेत रस्त्यावरील झाडे साफसफाई करण्याचे काम करण्यात आले. सदरचे काम प्रशासनाच्या अनास्थेमुळे आणि राजकर्त्यांच्या दुर्लक्षामुळे नाईलाजास्तव ग्रामस्थांना करावे लागले असून सदर श्रमदानाकरीता शशी लोखंडे यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे स्थानिक जागृत विकास मंडळाचे अध्यक्ष विजय अवेरे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

## प्रत्येक एसटीत पर्यायी चालक ठेवा - राजू पाटील यांची मागणी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, डोबिंवली (ठाणे) :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आलिशान बस होस्टेस बसची घोषणा केली असली तरी मनसे नेते आमदार राजू पाटील यांनी यावर उपहासात्मक भाष्य केले. त्यांनी सांगितले की, हे होईल तेव्हा होईल, पण सध्या मुंबई-गोवा हायवेची चाळण झाली आहे. गणपती उत्सवात मोठ्या प्रमाणावर कोकणवासीय प्रवास करणार असल्याने प्रत्येक बसची फिटनेस तपासणी करूनच ती सोडावी, तसेच थकव्यामुळे अपघात टाळण्यासाठी प्रत्येक बसमध्ये पर्यायी चालक ठेवावा, अशी मागणी माजी आमदार राजू पाटील यांनी केली आहे.

## मुगट सर्कलमध्ये मराठा आरक्षण जनजागृती संदर्भात मोटरसायकल रॅली



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांतील मुगट सर्कल मधील सर्व मराठा बांधवांनी रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी मराठा आरक्षण संदर्भात दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज जरांगे पाटील यांचे मुंबई येथे बेधडक मोर्चा निघणार असून मराठा आरक्षण मोर्चात सहभागी होण्यासाठी सर्व लोकांत जनजागृती करण्यासाठी मुगट सर्कलमधील सर्वपक्षीय मराठा बांधव एकत्र येऊन मोटरसायकल रॅली काढण्यात आली. यावेळी मोटर सायकल रॅलीची सुरुवात मुगट पासून आमदुरा, शिखाचीवाडी, रोहीपिंपळगाव,वसंतवाडी, दरेगाव, खुजडा, टाकळी, चिलपिंपरी, महाटी, माळकौठा, कामळज, देवापुर, शंखतीर्थ, वासरी या गावात प्रत्यक्ष भेटी देऊन मुंबई येथे निघण्यास सर्वांनी तयारी करावी.

आपल्या हक्कांच्या लढ्यात सहभागी व्हावे असे रॅलीच्या माध्यमांतून आवाहन करण्यात आले. सर्व गावातील लोकांनी 'एक मराठा लाख मराठा',' जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है' 'आता कुठे जायचं मुंबईला जायचं!, 'सरसकट मराठ्यांना ओबीसी मधून आरक्षण मिळालेच पाहिजे' 'राज्यकर्ते झाले बहिरे, आमची मागणी सगे सोयरे' अशा घोषणा देत रॅलीला स्फुर्तपणे प्रतिसाद दिला आणि शेवटी आमदुरा येथे राष्ट्रगीताने मोटरसायकल रॅलीची सांगता झाली. यासाठी मुगट सर्कल मधील सर्व मराठा बांधवांनी परिश्रम घेतले

## मुक्रमाबाद पोलीस ठाण्यात शांतता समिती बैठक संपन्न

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२३, मुखेड (नांदेड) :** मुक्रमाबाद येथील पोलीस ठाण्यात आगामी गणेशोत्स्व व ईद ए-मिलाद याहोणा-या सनाचे औच्वित्त साधुन मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे स.पो.नि.राजेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाली. आगामी काळात साजरा होणा-या गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद च्या पार्श्वभूमीवर पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच प्रतिनिधी बालाजी बोधने, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गौसखां पठाण, ग्रा.प.सदस्य बालाजी पसरगे, पत्रकार अशोक लोणीकर, शाकेर काझी, माजी ग्रा.प.सदस्य रज्जाक कुरेशी, पोलिस पाटील व्यंकट सुवर्णकार, अब्दुल पटेल, शिवदास बोधने, रहेम्तुला मौलिसाब, मगदुम पठाण, ईसा चौधरी, शफी कुरेशी, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# उल्हासनगरात 'ऑपरेशन ऑल आऊट'; पोलिसांची मोठी कारवाई

## ८ अटक - ५२ जणांवर नोटीस



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२४, उल्हासनगर (ठाणे) :** गुन्हेगारी व असामाजिक प्रवृत्तीवर आळा बसावा. यासाठी कल्याण पोलिसांच्या झोन-४ अंतर्गत २४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री (१२ ते ३ वाजेपर्यंत) भव्य 'ऑपरेशन ऑल आऊट' राबविण्यात आले. पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश काळे (अंबरनाथ विभाग) व अमोल कोळी (उल्हासनगर विभाग) यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात छापेमारी आणि कॉम्बिंग ऑपरेशन करण्यात आले.

**कारवाईचा तपशील :**

पोलिस मनुष्यबळ : अधिकारी - ४६, अमलदार - २०५ (एकूण २५१)

दारूबंदी प्रकरणे : ०९ / ०९ नोटिसा

जुगार प्रकरणे : शून्य

एनडीपीएस (अंमली पदार्थ सेवन) : १० प्रकरणे / १० नोटिसा

कॉपा (तंबाखू संबंधित गुन्हे) : २७ प्रकरणे / २७ नोटिसा

वारंट बजावणी : ०५ (०३ नोटिसा / ०१ अटक / ०१ मृत)

एम.पी. कायदा कलम १४२ : ०६ प्रकरणे (०४ अटक / ०२ नोटिसा)

लॉज व बार तपासणी : ९८

हिस्ट्रीशीटर तपासणी : १५४

आर्म्स ॲक्ट प्रकरणे : ०४ (०३ अटक / ०१ नोटीस)

प्रतिबंधात्मक कारवाई : ३३ प्रकरणे; ५६ एनसी (सर्व नोटिसा बजावल्या)

नाकाबंदी : ०८ ठिकाणी; २९६ वाहने तपासली; वाहतूक पोलिसांच्या मदतीने ₹८६,५०० दंड वसूल

**निष्कर्ष :**

या मोहिमेत ८ आरोपींना अटक करण्यात आली असून ५२ जणांवर नोटिसा बजावण्यात आल्या. मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक कारवाई करून शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न करण्यात आला. पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या मोहीम पुढील काळात ही सुरू राहतील.

# दोन दुचाकीच्या धडकेत एक जण गंभीर जखमी

## जखमीवर साईज्योत हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, महापे (ठाणे) :** उमेश शालिक वास्कर हा शील फाट्यावरून कोपरखैरणे येथील हर्षला मोरेश्वर आगास्कर बहिणीच्या घरी चालला होता. टीव्हीएस कंपनीची जुपिटर स्कूटी क्रमांक एम एच ०४ एल यु ८२२९ ही स्कुटीवर प्रवास करत होता. त्यावेळी दिनेश रमेश घुगे यांनी महापे - कोपरखैरणे उड्डाण पुलावर त्याला मागून जोराने धडक दिली. त्यामुळे दोघेही ते रस्त्यावर पडले. यात उमेश वास्कर गंभीर जखमी झाला असून त्यांना दवाउपचार कामी साई ज्योत हॉस्पिटल कोपरखैरणे येथे ॲडमिट करण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्यांचे एक्स-रे काढून त्यांचे हीप बोन ला फ्रॅक्चर झाल्याचे सांगितले आहे. हाता पायाला ही खरचटले आहे. दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ६:०० ते ८:३०च्या दरम्यान त्यांचे ऑपरेशन झाले आहे. आजचा हॉस्पिटलचा त्यांचा चौथा दिवस आहे. अजून ते हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत.

हॉस्पिटलचा खर्च ३ ते ४ लाखापर्यंत जाऊ शकतो असे डॉक्टरांनी त्यांना सांगितले आहे. उमेश वास्कर यांचे भाऊ रामदास वास्कर यांनी तुर्भे पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

दिनेश रमेश घुगे वय १९ राहणार मालतोंडी, तालुका परतुर, जिल्हा जालना, सध्याचा पत्ता पारसिक बँकच्या मागील झोपडपट्टी कोपरखैरणे स्टेशन समोर सेक्टर ५ कोपरखणे नवी मुंबई असे त्यांनी सांगितले आहे. गाडीचा क्रमांक एम. एच. ४३ बी.जे.४७४९ काल्या रंगाची एक्टिवा, बी. एच. पाटील कोपरखैरणे सेक्टर ५ यांची मालकीची असल्याचे त्यांनी सांगितले. दिनेश रमेश घुगे याच्याजवळ ड्रायव्हिंग लायसन्स सुद्धा नाही आहे. विना ड्रायव्हिंग लायसन ने तो गाडी चालवत होता. दिनेश रमेश घुगे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे तसेच स्कुटी चे मालक यांच्यावरही गुन्हा दाखल झाला आहे.

# डिजिटल युगात नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे - पोलीस उपायुक्त झेंडे



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२३, कल्याण (ठाणे) :** आजच्या डिजिटल युगात गुन्हेगार तंत्रज्ञानाचा गैरवापर करून नागरिकांची आर्थिक फसवणूक करीत आहेत. त्यामुळे मोबाईलवर येणारे संशयास्पद कॉल किंवा मेसेज यांचा मोह न बाळगता प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कल्याण परिमंडळ-३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी केले.

प्रेस क्लब, कल्याणच्या वतीने आचार्य अत्रे कॉन्फरन्स हॉल येथे दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पोलीस निरीक्षक बाळासाहेब उघडे, प्रेस क्लबचे अध्यक्ष आनंद मोरे, कार्याध्यक्ष कुणाल म्हात्रे, सचिव विष्णुकुमार चौधरी तसेच ज्येष्ठ पत्रकार रमेश दुधाळकर व विनायक बेटावदकर उपस्थित होते. याच कार्यक्रमात प्रेस क्लबच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सुरुवात झाली असून, नवीन लोगोचे अनावरण झेंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

झेंडे यांनी सांगितले की, गेल्या काही महिन्यांपासून पोलिसांकडून अमली पदार्थविरोधी विशेष मोहीम राबवल्या जात आहेत. शाळा व महाविद्यालयांमध्ये 'पोलीस दादा' व 'पोलीस दिदी' यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती आणि कायदेशीर मार्गदर्शन दिले जात आहे. शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी 'पोलीस मित्र' देखील महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी नमूद केले. 'डायल ११२' या क्रमांकावर तक्रार प्राप्त होताच पोलिस केवळ सात मिनिटांत घटनास्थळी पोहोचतात, असे झेंडे यांनी स्पष्ट केले. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत करत आहेत. त्याचबरोबर दुकानदारांनी आपल्या दुकानाबाहेर रस्त्याकडे तोंड असलेला कॅमेरा बसविल्यास गुन्ह्याच्या तपासात तो उपयुक्त ठरेल, असे आवाहन ही त्यांनी केले.

कल्याण-डोंबिवली शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता कल्याण (पूर्व) व काटई नाका येथे नवीन पोलीस ठाण्यांची उभारणी करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन दत्ता बाठे यांनी मानले.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देशातील पहिल्या 'स्मार्ट' व 'इंटेलिजेंट' सातनवरी गावाचा शुभारंभ




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, ठाणे :** आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा सातनवरी गावात उपलब्ध करून देत समृद्ध गावाचे 'रोल मॉडेल' उभे राहिले आहे. लवकरच राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील १० गावे. 'स्मार्ट' व 'इंटेलिजेंट' करण्यात येणार आहे. याद्वारे पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास ३ हजार ५०० गावे 'स्मार्ट' व 'इंटेलिजेंट' करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत २४ कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत राज्य शासन व नागपूर जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवा उपलब्ध करून देत या गावाला देशातील पहिले 'स्मार्ट' व 'इंटेलिजेंट' गाव बनविले आहे. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या सर्व आधुनिक सुविधा असलेल्या गावाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला.

त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. कार्यक्रमास महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर, सातनवरी गावाच्या सरपंच वैशाली चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून गावात सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातनवरी या 'स्मार्ट' व 'इंटेलिजेंट' गावाचा शुभारंभ हे क्रांतीकारक पाऊल असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गावांना सक्षम करण्याच्या दिशेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील गावागावांमध्ये भारतनेट प्रकल्प राबविला गेला. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी राज्यात होऊन दुसऱ्या टप्प्याची सुरूवातही झाली. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महानेट हा प्रकल्प राबविण्यात आला.

आता याच प्रवासात भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकत गावांमध्ये आरोग्य, शिक्षणासोबतच स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी अशा एकूण १८ सेवा कमी वेळात उपलब्ध करून देत सातनवरी हे देशातील पहिले 'स्मार्ट' व 'इंटेलिजेंट' गाव ठरले आहे.

# मुंब्रा, दिव्यातील अनाधिकृत बांधकामांवर पालिकेच्या विशेष पथकाची करडी नजर

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.२४, ठाणे :** ठाण्यातील अनधिकृत बांधकामांना चाप लावण्यासाठी, दिवा आणि मुंब्रा या भागावर देखरेख करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी यांचे विशेष पथक निर्माण करण्याचे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.दिवा आणि मुंब्रा भागात अनधिकृत बांधकामांच्या अधिक तक्रारी आहेत. त्याची शहानिशा करण्यासाठी तसेच देखरेख करण्यासाठी या विशेष पथकाची निर्मिती केली जाणार असल्याचे, आयुक्त राव यांनी स्पष्ट केले आहे.

अनधिकृत असलेली घरं किवा इमारतींवर गणेशोत्सव काळात कोणतीही कारवाई केली जाणार नाही. महापालिका क्षेत्रातील या कारवाईचा आढावा महापालिका आयुक्त राव यांनी शनिवारी झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत घेतला.



या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, परिवहनचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, नगररचना सहाय्यक संचालक संग्राम कानडे यांच्यासह विभागप्रमुख, सर्व उपनगर अभियंता, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता उपस्थित होते. उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे यांनी बैठकीत कर्मयोगी पोर्टल, १५० दिवसांचा कार्यक्रम आदी विषयांबाबत सादरीकरण केले. उपायुक्त शंकर पाटोळे यांनी अनधिकृत बांधकामांवरील कारवाईची माहिती दिली. तर, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी गणेश मूर्ती कार्यशाळा आणि विसर्जन व्यवस्था याची माहिती दिली.

दरम्यान उच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सर्व प्रभाग समिती क्षेत्रात कारवाई सुरू आहे. आतापर्यंत २२७ बांधकामांवर कारवाई झाली असून २४ गुन्हे दाखल झाले आहेत. या कामात अडथळा आणणाऱ्यांवर शासकीय कामात अडथळा आणल्याबद्दल गुन्हा दाखल करावा, असे निर्देशही आयुक्त राव यांनी दिले.

पावसाळ्यातील आताचा काळ धोकादायक इमारतींसाठी कसोटीचा असतो. त्यामुळे अजूनही ज्या अतिधोकादायक इमारतींमध्ये नागरिक राहत आहेत त्या इमारती तातडीने रिक्त करून त्या सील कराव्यात. त्याचा ताबा पुन्हा रहिवाशांनाच दिला जाईल, असा विश्वास त्या नागरिकांना द्यावा, असे आयुक्त राव यांनी पुन्हा स्पष्ट केले.

# गणेशोत्सवात सायबर सेलची करडी नजर : महानिरिक्षक कराळे

## चुकीची माहिती प्रसारित केल्यास तात्काळ कारवाई...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** गणेशोत्सव काळात जिल्हा पोलीस दलाने समाज माध्यमांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सायबर सेलची यंत्रणा अद्ययावत करण्यात आली आहे. त्यामुळे चुकीची माहिती, संदेश, मजकूर प्रसारित करणारे लगेच शोधले जाणार आहेत. यामध्ये संदेश प्रसारित करणार्यांचे फॉलोअर्स, ते कोणते यूट्यूब चॅनल पाहतात, कोणाला संदेश पाठवतात याचाही शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी दिले आहेत.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस महानिरीक्षक कराळे यांनी जिल्हा दौरा करत पोलीस अधिकार्यांसह गणेश मंडळांच्या बैठका घेत विविध सूचना केल्या. त्यानंतर त्यांनी शनिवारी नगरमध्ये पत्रकारांशी संवाद साधला.



जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे व सोमनाथ वाकचौरे, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी आदी उपस्थित होते. जिल्ह्यात तीन हजार मंडळांकडून गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना होण्याची शक्यता आहे. त्यातील २३१ ठिकाणी एक गाव-एक गणपती संकल्पना राबवली जाईल. त्यामध्ये वाढ करण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न आहेत.

**५०० समाजकंटक हद्दपार होणार !**

गणेशोत्सव काळात समाजकंटकांवर लक्ष ठेवले जात आहे. त्यासाठी पोलिस ठाणेनिहाम यादी तयार करण्यात आली आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या ५०० जणांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. उत्सव काळात त्यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यासाठी कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

जिल्ह्यात बंदोबस्तासाठी ३ हजारावर पोलीस कर्मचारी, १५०० गृहरक्षक दलाचे जवान, ६ धडक कृती दल उपलब्ध आहे. उत्सव काळात त्यांच्या रजा बंद करण्यात आल्या आहेत. याच दरम्यान ईद-ए-मिलाद सण येत असल्याने विशेष दक्षता घेतली जात आहे, असेही कराळे यांनी सांगितले. उत्सव काळात पोलिसांच्या मदतीसाठी स्वयंसेवकही नियुक्त केले जाणार आहेत. बंदोबस्तावर ड्रोन, सीसीटीव्ही कॅमेरे याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. सार्वजनिक तरुण मंडळांना मंडपावर सीसीटीव्ही बसवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील रस्ते, चौकाचौकातील सीसीटीव्ही सुरू आहेत का,याची खातरजमा केली जात आहे, पोलिस ठणेनिहाय शांतता समितीच्या बैठका सुरू करण्यात आल्या आहेत. शहरातील रस्ते अनेक ठिकाणी खोदले जात आहेत. ते उत्सवापूर्वी पूर्ववत करण्यासाठी महापालिका आयुक्तांशी संपर्क करण्यात आला आहे. असेही महानिरीक्षक कराळे यांनी सांगितले. मंडळांनी उभारलेले फलक, झेंडा यातून तणावाच्या घटना घडू नयेत यासाठी खबरदारी घेतली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

# अमावस्येनिमित्त शिंगणापुरात ४ लाख भाविकांचे शनि दर्शन...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** श्रावण महिन्यातील शेवटच्या शनिवारी आलेल्या पिठोरी अमावस्येमुळे शनिशिंगणापुरात गर्दीचा महापूर दिसून आला. सुमारे ४ लाख भाविकांनी दर्शन घेतले. शुक्रवारी पहाटेपासूनच दर्शनासाठी पंचक्रोशीतील व राज्यातील भाविकांचा जनसागर उसळला. राहुरी-शनिशिंगणापूर रस्त्यावर शेवगाचे पोलीस उपाध्यक्ष गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली शनिशिंगणापूरचे सहायक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांनी वाहतूक सुरळीत ठेवल्याने कुठेही वाहतूक कोंडी झाली नाही.

पहाटेची आरती सौरव बोरा व माजी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते झाली. दुपारची आरती किशोरजी यांचे हस्ते तर सायंकाळची आरती माजी मंत्री आमदार शिवाजीराव कर्डिले व शनिशिंगणापूरचे सरपंच बाळासाहेब बनकर यांच्या हस्ते करण्यात आली. दिवसभरामध्ये अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, आमदार विठ्ठलराव लंघे, माजी आमदार



अण्णासाहेब माने व पद्मश्री पोपटराव पवार यांनी दर्शन घेतले. भंडाराच्यारूपाने ठिकठिकाणी अन्नदानाचे प्रसाद वाटप करण्यात आले. देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर, सरचिटणीस आप्पासाहेब शेटे, विश्वस्त दीपक दरंदले, प्रा. शिवाजीराव दरंदले, सयाराम बानकर, यांनी अतिथीचे स्वागत केले. आमदार शिवाजीराव कर्डिले व अक्षय कर्डिले यांच्यातर्फे शनिशिंगणापूरमध्ये खिचडीचे वाटप करण्यात आले.

# विसापुरात पुरांची वेदना बाजुला सारून चढवला सर्ज्याराजावर साज !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २४, विसापूर (चंद्रपूर) :** अलीकडे वर्धा नदीला पूर आला होता. पुरामुळे शेतपिकांची नासाडी झाली. याची वेदना बाजुला सारून बळीराजाने बैल पोळ्यात सर्ज्याराजावर साज चढविला. बैलजोडी स्पर्धेत तब्बल ७२ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. विसापूरच्या पंचक्रोशीत पहिल्यांदा अनोखा बैलपोळा साजरा केला. यामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक कार्यकर्त्ये, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बळीराजा प्रती कृतज्ञतापूर्वक भेट वस्तू प्रदान करून बैलजोडी धारक शेतकऱ्यांचा सन्मान केला. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंढरीनाथ देवस्थान, मंगल कार्यालय परीसरात बैलजोडी सजावट स्पर्धा पहिल्यांदा आयोजित केली. यामुळे गावात जत्रेचे स्वरूप आले.

विशेष म्हणजे सजावट केलेल्या बैलजोडीचे परिक्षण करण्यासाठी दुसऱ्या गावातील परिक्षक आले. यामुळे पोळ्यात होणाऱ्या वादावर विराम बसला. बैलजोडी



सजावट स्पर्धेत प्रथम आकाश बंडू थेरे, द्वितीय आशिष सत्यपाल पादे, तृतीय अनिकेत गिरडकर, चौथे अमोल मधुकर भोयर, पाचवे सचिन डाहुले, सहावे अक्षय पाटणकर, सातवे रविंद्र येवले, आठवे रविंद्र ताजने, नववे हंसराज ताजने व दहावे साईनाथ थेरे यांना ग्रामपंचायत मार्फत शेती उपयोगी साहित्य प्रदान करुन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्याच प्रमाणे सहभागी बैलजोडी धारक शेतकऱ्यांना फवारणी पंप व वॉटर जग देखील वितरण करण्यात आले. माजी अर्थ, नियोजन व वन मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या वतीने प्रत्येक बैलजोडी धारक शेतकऱ्यांना दिवाल घडी व माजी जिल्हा परिषद सदस्य सुमनताई गौरकार यांच्या मार्फत छत्रीचे वाटप करण्यात आले. पोळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक बैलजोडी धारक शेतकऱ्यांचे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी औक्षण करुन टॉवेल देण्याची परंपरा जोपासली. विशेष म्हणजे मधुकर भोयर यांनी बळीराजा व्यथेवर गीतगायन करून शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

बैलजोडी सजावट स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रभाकर देरकर, निशांत मोरे, डॉ.सुनील आलाम, उमेश देवाळकर व बंडू ठाकरे यांनी योगदान दिले. यावेळी सरपंच वर्षा कुळमेथे, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य शारदा डाहुले, सुरज टोमटे, रिना कांबळे, हर्षला टोंगे, वैशाली पुणेकर, गजानन पाटणकर, माजी उपसरपंच सुनील रोंगे, सुरेखा इटनकर, प्रदीप गेडाम, दिलदार जयकर, शशीकला जीवने, विद्या देवाळकर, संदीप काकडे, ग्राम पंचायत अधिकारी गणेश कोकोडे, लिपीक संतोष निपुंगे, राहूल टोंगे, अशोक ठुणेकर व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# थोडक्यात

## मंत्रालयात सेबी आयोजित गुंतवणूक प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२३, मुंबई :** मुंबई येथे मंत्रालयात नुकतेच सेबी द्वारे योग्य गुंतवणूक करण्यासाठी आपण कोणती काळजी घेतली पाहिजे तसेच स्टॉक मार्केट मध्ये पैसे गुंतवणूक करण्यासाठी उपलब्ध असलेल्या संधी व जोखीम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सद्य परिस्थितीत अनेक लोकांचा मेहनतीचा पैसा कसा गुंतवणूक करावी याची योग्य माहिती नसल्यामुळे एका क्षणात धोकाधडी करून फसवणूक झाल्याचे अनेक उदाहरणे आपण नेहमीच पाहत असतो, धोका होणार नाही यासाठी आपण कोणती काळजी व जबाबदारी घेतली पाहिजे तसेच योग्य गुंतवणूक करण्यासाठी उपलब्ध असलेल्या संधी यावर सेबीचे राहुल केळापूर, वरिष्ठ अधिकारी व संदीप कृपलानी जनरल मॅनेजर यांनी माहिती दिली. सदर प्रशिक्षण कार्यक्रम प्रथमच मंत्रालय मुंबई येथे पार पडला. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मंत्रालय मुंबई येथील कर्मचारी संघटना याचे अध्यक्ष रविन्द्र मंजुळे व सर्व कार्यकारी सदस्य तसेच सदर प्रशिक्षण कार्यक्रम प्रथमच मंत्रालय मुंबई येथे घेण्यात येण्यासाठी प्रदीप के मून, माजी उपसंचालक, श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकार तसेच सेबी स्मार्ट, भरत दावे एजीएम बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, मनोज नाहक सेबी स्मार्ट यांनी प्रयत्न केले.

## श्रीवास नगर महादुला येथे तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.२३, नागपूर :** दरवर्षी प्रमाणे यंदाही क्रांतिवीर श्यामलाल बाबू श्रीवास स्मृती बहुद्देशीय संस्था द्वारे श्रीवास नगर गोडबोले चौक महादुला येथे तान्हा पोळा उत्सव व मटकी फोड स्पर्धेचे आयोजन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उदघाटन राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेतील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते उकृष्ट नंदिबैल सजावट, वेशभूषा व मटकी फोड स्पर्धेतील विजेते पवित्र हरिहर, रिधान सामृतवार, दिशांत लांडगे, भवयांस वानखेडे, मानव पोंगळे, अमित कुमार आदिना पारितोषिके वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाला अतिथी म्हणून महादुला नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी, भाजपा नगराध्यक्ष प्रितम लोहासारवा, पन्नालाल रंगारी, रामबाबू तोडवाल, मनोज सावजी, अरुण उजवणे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे पदाधिकारी शंकर शेंडे, मुन्ना मेश्राम, ताराचंद पारधी, पुरण आगासे, नमिता गोडबोले, घनश्याम मेश्राम, बाबुलालजी मोटघरे, काशीराम आगासे, ब्रिजलाल खोब्रागडे, स्नेहल मेश्राम, राजेश बोरकर, योगेश मेश्राम, राहुल इंगोले, प्रविण वानखेडे, प्रितेश वानखेडे, सुमित मेघराज, उमेश बावनकर, नीतून आगासे, नितीन चिंधालोरे, प्रफुल नारनवरे, राजकुमार नारनवरे, गौतम गजभिये, अश्विन डोंगरे, अभिजित इंगोले, निरंजन वालदे, रवींद्र मेश्राम, सचिन लखारे, भाग्यश्री चिंधालोरे, राकेश करसायल,विक्की खरवडे, संजय राऊत, मनिष आगासे, अजय मानकर आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक व संस्थेचे सचिव अमरजीत गोडबोले यांनी केले.

## कोंढा येथे तान्हा पोळा आनंदात साजरा

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२३, भद्रावती (चंद्रपूर) :** भद्रावती तालुक्यातील कोंढा गावात तान्हा पोळा सण आनंदात साजरा करण्यात आला. तान्हा पोळा हा बाल गोपालाचा आनंदाचा सण असतो. यामध्ये एकुण २२० स्पर्धकानी पर्यावरण संवर्धन, शेती काळाची गरज, प्रदूषण समस्या, गावाचा विकास या विषयावर आकर्षक देखाव्यासह सहभाग घेतला. सर्व स्पर्धकातून लकी ड्रा च्या माध्यमातून श्रेया नाकाडे ची निवड करून खा.प्रतिभा धानोरकर चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा यांचे कडून टि.व्ही. भेट देण्यात आली. नंदी बैल सजावटी चे प्रथम क्रमांक भाविक डोंगे, द्वितीय क्रमांक अथंग राघमवार, तृतीय क्रमांक भाविक राजूरकर, चतुर्थ क्रमांक आराध्या डोंगे, पाचवा क्रमांक शिवण्या नागपुरे, वेदांत मत्ते, सुयाशु आत्राम, रिषभ नागपुरे, आर्यन डाहुले, लक्की मन्ने, देवांश डोंगे, ऋतुजा मत्ते, विष्णू गोंडे, विहान देठे यांची निवड करून बक्षीसे देण्यात आली. तसेच प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली. सहभागी सर्व बालगोपालांना जय भवानी सर्व्हिसेस कोंढा यांचेकडून प्रत्येकाला टिफिन बॉक्स वितरित करण्यात आले. नंदी बैल स्पर्धेचे सजावट परीक्षण सुनिल देठे, राकेश मत्ते, नितीन गौरकर, गणेश सातपुते यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन महेश मोरे सरपंच तर आभार गणेश उपरे यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी सरपंच महेश मोरे, उपसरपंच मंगेश मंगाम, भारत मोरे, अजय मत्ते, महेश मत्ते, अमोल देठे, नितीन गौरकर, प्रकाश चिकटे, राजू ढेंगळे, प्रशांत चिकटे, राजू डोंगे, नितीन डोंगे, विजय ठेंगे, स्वप्नील मंगाम तसेच साई गणेश मंडळ, गुरुदेव सेवा मंडळ, मराठा वरियर्स मंडळ, जगन्नाथ मंडळ, न्यू जगन्नाथ मंडळ तसेच समस्त गावकरी यांनी सहकार्य केले.

## जि.प.म.प्रा.शाळा पिंप्री गवळी येथे तान्ह्या पोळ्याची धमाल

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२३, पिंप्री गवळी (बुलडाणा) :** दिनांक २३/०८/२०२५ रोजी कृषीप्रधान संस्कृतीतील एक महत्वाचा सण तान्हा पोळा जि.प.म.प्रा.शाळा पिंप्री गवळी येथे उत्साहात साजरा करण्यात आला. उत्तम सजावट करुन बैलांची पूजा करण्यात आली. बैलांना पुरणपोळी खायला देण्यात आली. आपल्यासाठी दिवस रात्र कष्ट सहन करणाऱ्या बैलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मुलांनी घरून बनवून आणलेल्या मातीच्या बैलांचे प्रदर्शन भरविण्यात आले. भारतीय संस्कृतीत बैलांचे स्थान याबाबत विद्यार्थ्यांना सरोदे गुरुजींनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक विजय वराडे, सहाय्यक अध्यापिका योगिनी पऱ्हाड, मंजुषा बांगर, शा.पो.आ. मदतनिस मायाबाई सिरसाट तसेच प्रगतिशील शेतकरी गणेश बळिराम लहासे यांनी खूप मेहनत घेतली.